जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2017
लोकमत

# विद्यापीठात महात्मा फुले यांना अभिवादन

कोल्हापूर : महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागात त्यांच्या स्मृतींना मंगळवारी अभिवादन करण्यात आले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

1 2 APR 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षक समकक्ष पदांसाठीचा सुधारित एपीआय मसुदा मान्य

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने ३० जून २०१० ला अधिसूचना काढली होती. या सूचनेमध्ये ४ मे २०१६ व ११ जुलै २०१६ रोजी अनुक्रमे तिसरी व चौथी सुधारणा केली होती. या अनुषंगाने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांसाठी सुधारित केलेल्या एपीआय गुणांक मसुदा मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. हा निर्णय कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार बोर्ड ऑफ डीन्स व बोर्ड ऑफ रिसर्च यांच्या शिफारशीनुसार एम. फील. व पीएच. डी. नियमावली दुरूस्तीसह मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

**पान ४ पहा**

# शिक्षक समकक्ष पदांसाठीचा सुधारित एपीआय मसुदा मान्य

**पान १ वरून**

शिवाजी विद्यापीठ संलग्नित विविध महाविद्यालयांकडून प्राथमिक संलग्नीकरण, संलग्नीकरणाचे नूतनीकरण, नैसर्गिक विस्तार, प्रयोगशाळा मान्यता, प्रवेश क्षमता वाढ व घट इत्यादी संदर्भात प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्या प्रस्तावांच्या अनुषंगाने स्थानिक चौकशी समित्यांनी सुधारित गुणांक पद्धतीने सादर केलेल्या अहवालांच्या अनुषंगाने संलग्नीकरण देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2017
सकाळ

# 'डेक्कन'चा निकाल १०० टक्के

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्टिफिकेट कोर्स इन इमुव्हेबल प्रॉपर्टीज कोर्स परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इन्स्टिट्यूटचा निकाल १०० टक्के लागला. इचलकरंजीतील इंजिनिअर गजानन ढवळे प्रथम तर सांगली येथील इंजिनिअर अमोल पाटील द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या कोर्सची पुढील बॅच लवकर सुरू होत असून इच्छुकांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन केले आहे. कोणत्याही शाखेची पदवी किंवा पदवीधर पात्र राहील, असे कार्यालयीन अधीक्षक राजन भुरके यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2017
लोकमत

# जोंधळे यांचे व्याख्यान

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी १२६ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि. १४) शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. यात सकाळी साडेनऊ वाजता खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते प्रतिमापूजन, तर कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते भारतीय राज्य उद्देशिकेचे उद्घाटन होईल. यानंतर राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेंद्र जोंधळे यांचे व्याख्यान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
12 APR 2017 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या नव्या कायद्याबाबत चर्चासत्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६' या नव्या कायद्याबाबत मार्गदर्शनपर चर्चासत्र बुधवारी (दि.१२) शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आले आहेत. विद्यापीठातील सर्व अधिविभागांचे प्रमुख, संचालक, समन्वयक, अधिकारी उपस्थित राहणार आहेत.